माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००१५५

**अपिलार्थी - श्री. पंढरीनाथ बाबाराव आरदवाड,**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (प्रशा-३)**
शालेय शिक्षण विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी,**
शालेय शिक्षण विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २९.०५.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १९.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०९.२०२३ | ०७.११.२०२३ | ०८.११.२०२३ | ०५.०१.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०१.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन व्दितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २६.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार मा. मुख्यमंत्री सचिवालय यांच्या दि. १५.०९.२०२३ रोजीच्या पत्रावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थी यांनी दि. ०८.११.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांचे दि. २०.०५.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करुन नमूद केले की, सदर सुनावणीसाठी मला ऐकू येत नसल्यामुळे व वयोमानामुळे (९१ वर्षे) असल्यामुळे अनुपस्थित राहण्याचा पर्याय स्विकारत आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.२७.०५.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर करुन नमूद केले की, सदर माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने शासनपत्र दि. ०७.११.२०२३ अन्वये अर्जदार यांना उत्तर देण्यात आले आहे. श्री.आरदवाड यांनी उक्त माहिती अधिकार अर्जान्वये ज्या अर्जाची माहिती मागितली होती तो अर्ज कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण), पुणे यांना शासन पत्र दि. ०६.११.२०२३

..२/-

अन्वये पाठविण्यात आला असल्याचे कळवून त्याची प्रत त्यांना देण्यात आली आहे. वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या आलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अर्जदार श्री. आरदवाड यांनी दि. ०८.११.२०२३ अन्वये उप सचिव तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी, शालेय शिक्षण यांच्यासमोर प्रथम अपिल सादर केले. त्याअनुषंगाने उप सचिव यांच्या दालनात दि. ०५.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु, सदर सुनावणीस अपिलार्थी श्री. आरदवाड हे उपस्थित राहिले नाहीत. त्यास अनुसरुन सर्व कागदपत्रांच्या छाननीअंती जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती कळविली असल्यान जनमाहिती अधिकारी यांच्या निर्णयाशी सहमती दर्शवून सदर अपिल दि. ०५.०१.२०२४ च्या आदेशान्वये निकाली काढण्यात आले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२५**